औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची दिनांक ९.३.१९९६ रोजी झालेल्या १०१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

१] श्री. किशनचंदजी तनवाणी — सभापती, औरंगाबाद मंडळ

२] श्री. चौधरी एस. डी. उपसंचालक, नगररचना औरंगाबाद विभाग, औरंगाबाद. — सदस्य

३] श्री. भास्कर मुंढे मुख्य अधिकारी/औ.मं. — सदस्य

४] श्री. संतोष कादरी, उपअभियंता [स्लम] आयुक्त, औरंगाबाद मनपा औरंगाबाद — यांचे सदस्य प्रतिनिधी.

५] श्री. पुंडलीक माधवराव शिंदे — सदस्य

६] श्री. नारायणराव जाधव — सदस्य

७] श्रीमती उषा साने — सदस्य

८] श्रीमती कमल पद्माकर तुल्ले — सदस्या

९] श्री. गणेश नाहोरे — सदस्या

१०] श्री. सुकेश जयस्वाल — सदस्य

११] श्री. आसारामजी तळेकर — सदस्य

१२] श्री. अशोक लोंढे — सदस्य

१३] श्री. सुरेश जैन — सदस्य

१४] श्री. सुजीत ठाकूर — सदस्य

१५] ॲड. कैलासचंद सेठी — सदस्य

१६] प्रा. नंदु कुलकर्णी — सदस्य

सदस्य

सामुहिक वंदेमातरम नंतर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरसंघसंचालक, मा. बाळासाहेब देवरस यांचे दिनांक १६.६.९६ रोजी दिर्घ आजाराने निधन झाल्याने त्यांना मंडळाच्यावतीने श्रध्दांजली अर्पण करुन मंडळाच्या बैठकीस सुरुवात करण्यात आली.

प्रा. नंदु कुलकर्णी सदस्य औ.मं. यांनी मा. सभापती व मंडळाच्या असे निदर्शनास आणून दिले की, मेडिकल लेबर कॉलनी येथील भूखंडासाठी जाहिरात दिली परंतु त्याबाबत मंडळाच्या सदस्यांना काही माहितच नाही अथवा त्यांच्याशी जाहिरात देण्यापुर्वी चर्चा देखील केलेली नाही. त्यामुळे लोक मंडळाच्या सदस्यांना जाहिरातीबाबत विचारणा करतात व मंडळाच्या सदस्यांना याबाबत काही माहिती नसल्याने त्यांना माहिती देऊ शकत नाही.

या चर्चेच्या ओघात मंडळाच्या अनेक सदस्यांनी प्रतिपादन केले की, मंडळातर्फे ज्या जाहिराती प्रसिध्द करण्यात येतात त्यापुर्वी किमान ४ दिवस अगोदर प्रत्येक सदस्यांना त्याची प्रत मिळाली पाहिजे अशी व्यवस्था करण्यात यावी.

या अनुषंगाने श्री. सुजीत ठाकुर यांनी सांगितले की, गाळे वाटपासाठी/ भूखंड वाटपासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देतात त्याची प्रत सदस्यांना देण्यांत यावी. कारण सदस्यांना त्यांच्या भागातील भेटणाऱ्या लोकांना योजनेचा लाभ घेण्यासाठी सांगता येईल म्हणजे लोक अशा योजनापासून वंचीत राहणार नाहीत.

मुख्य अधिकारी यांना सांगितले की, जाहिरात देतांना सदस्यांना विचारले जात नाही किंवा प्राथमिक चर्चा केली जात नाही हे मान्य आहे व अशी कृती करणे आवश्यक वाटत नाही. जर याबाबत मंडळाने अशी कार्यपध्दती ठरविल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत येईल.

श्री. सुरेश जैन सदस्य औ. मं. यांना प्रतिपादन केले की, लातूर, नांदेड, औरंगाबाद या ठिकाणी औद्योगिकदृष्ट्या, व्यापारी दृष्टीने किंवा इतर कारणाने स्थाईक होण्याचा प्रत्येक नागरीकांचा विचार असतो त्यामुळे घरांची अडचण सोडवण्याच्या दृष्टीने प्रत्येक नागरीक प्रयत्न करतात त्यामुळे जाहिरातीपुर्वी जर जाहिरातीची प्रत सदस्यांकडे प्राप्त झाल्यास लोकांना त्याची माहिती देणे शक्य होईल.

श्री. आत्मारामजी तळेकर सदस्य औ. मं. यांनी श्री. जैन यांच्या सुचनेस सहमती दर्शविली व लोक मंडळाचे सदस्य या नात्याने सदस्यांकडे चौकशी करतात व सदस्यांना त्याची माहिती नसते त्यामुळे लोकांमध्ये गैरसमज होतो.

मुख्य अधिकारी यांना प्रतिपादन केले की, मा. सदस्यांच्या भावना मान्य आहे. गाळे किती शिल्लक आहे याची माहिती सदस्यांना देता येईल.

प्रत्येक वेळी मंडळाच्या सदस्यांशी चर्चा करून जाहिरात देण्याच्या प्रक्रियेस विलंब लागेल असे मुख्याधिकारी यांनी सांगितले

या चर्चेच्या अनुषंगाने मा. सभापती महोदयांनी प्रतिपादन केले की, मंडळाच्या वतीने देण्यात येणाऱ्या प्रत्येक जाहिरातीची प्रत मंडळाच्या सर्व सदस्यांना किमान ४ दिवस अगोदर पाठविण्यांत यावी.

कौठा नांदेड व परभणी येथील उर्वरीत गाळ्यासाठी अर्ज देण्यांत यावे अशी मागणी प्रा. नंदु कुलकर्णी/श्रीमती उषा साने यांनी केली.
त्यावर मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी जाहिरात देण्यात येईल व फॉर्म देण्यांत येतील असे प्रतिपादन केले.

यानंतर मंडळाच्या बैठकीच्या विषयपत्रिकेवरील विषय क्र. १ मंडळाच्या १०० व्या बैठकीच्या कार्यवृत्तांवर चर्चा करण्यांत आली.

विषय क्र. १ दिनांक २९. १. १९९६ रोजी भरलेल्या १०० व्या
बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणेबाबत.

मंडळाच्या १०० व्या बैठकीतील विषय क्र. २ वर चर्चा करतांना मंडळाचे सदस्य श्री. सुजीत ठाकुर यांनी विचारले की, डिसेंबर ९५ अखेरपर्यन्त झोपडपट्टी सुधार योजनेवर २०. २७ लक्ष खर्च करण्यात आले होते व ७०. ०० लक्षाची तरतुद होती. तेंव्हा मार्च ९६ अखेर झोपडपट्टी सुधार योजने अंतर्गत किती रक्कम खर्च झाली आहे.

यावर खुलासा करण्यांत आला की, मार्च ९६ अखेरपर्यन्त झोपडपट्टी सुधार योजनेवर ५२. ४३ लक्ष खर्च करण्यात आले आहे.

या अनुषंगाने मंडळाच्या सदस्यांनी प्रतिपादन केले की, झोपडपट्टी सुधार योजनेचे देयक अदा करण्यापुर्वी मंडळाच्या सदस्यांनी कामाची पाहणी केल्याशिवाय देयके अदा करण्यांत येऊ नये असे मंडळाच्या बैठकीत ठरले होते. परंतु त्याप्रमाणे मंडळाच्या सदस्यांना झोपडपट्टी सुधार योजनेचे कामे दाखविण्यांत आली नाही तरीही झोपडपट्टी सुधार योजनेची देयके अदा करण्यांत आली आहेत.

या अनुषंगाने खुलासा करण्यांत आला की, देयके अदा करावयाच्या कालावधीत आचारसंहीता असल्यामुळे असे करणे शक्य झालेले नाही. यापुढे झोपडपट्टी सुधार योजनेची देयके, मंडळाच्या सदस्यांना कामाची पाहणी केल्यानंतरच अदा करण्यांत येतील.

परभणी येथील झोपडपट्टी सुधार योजने अंतर्गत मिळालेल्या अतिरिक्त १ कोटीच्या निधीबाबत मु.अ. यांनी प्रतिपादन केले की, वि.नि. व वि.सं. ने झोपडपट्टी सुधार योजनेसाठी परभणी शहराला अतिरिक्त १ कोटीचा निधी मंजूर केल्याबाबतचे पत्र या कार्यालयास दि. ११.३.९६ रोजी प्राप्त झाले. सदर निधी शासनामार्फत प्राधिकरणाकडे येण्यास वेळ लागला.

परंतु अतिरिक्त निधीची तरतुद करतांना न.प. परभणीची एवढा निधी खर्च करण्याची कुवत आहे किंवा नाही हे पाहाणे आवश्यक होते कारण १९९५.९६ आर्थिक वर्ष संपण्यास फारच थोडा कालावधी शिल्लक होता या कालावधीमध्ये अंदाजपत्रकाची तपासणी करणे व मंडळाच्या बैठकीत झोपडपट्टी सुधार योजनेच्या कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेसाठी प्रस्ताव ठेवण्यासाठी मंडळाच्या स्तरावर सर्वतोपरीने प्रयत्न करण्यांत येत होते. व अंदाजपत्रके मंजूर होऊन न.प. परभणीस काम सुरु करण्यासाठी कमीत कमी २५% अग्रीम देण्याचा प्रस्ताव प्रस्ताव होता व त्यादृष्टीने २१.३.९६ रोजी मंडळाची विशेष बैठक आयोजित केली होती. परंतु २०.३.९६ ला लोकसभेच्या निवडणूका जाहीर झाल्या व आचारसंहीतेमुळे मंडळाची बैठक घेता आली नाही व म्हणून पुढील कार्यवाही करणे शक्य झाले नाही.

यावर श्रीमती [illegible]ने सदस्या औ.मं. यांनी विचारले की, झोपडपट्टी सुधार योजनेच्या मान्यतेसाठी प्राधिकरणाकडे जावे लागेल का ?

यावर खुलासा करण्यांत आला की, झो.सु. योजनेच्या प्रशासकीय मान्यतेचे अधिकार मंडळास आहे.

मंडळाचे सदस्य श्री. आसारामजी तळेकर यांनी विचारले की, मंडळाच्या ९६.९७ मध्ये ज्या गृहनिर्माण योजना प्रस्तावीत केल्या आहेत त्या योजनेसाठी जमिन उपलब्ध आहे, नियोजन व आराखडे तयार करण्यासाठी कांहीही अडचण नाही व सर्व बाबी पुर्ण करुन प्रशासकीय मान्यता मिळेल हे गृहीत धरुन अर्थसंकल्पात आर्थिक व भौतिक उद्दिष्टाकरिता समावेश करण्यांत आलेला आहे अशा योजनांची सद्यस्थिती काय आहे ?

या अनुषंगाने मु.अ. यांनी प्रतिपादन केले की, मंडळाच्या ५ योजना अशा आहेत की, प्राधिकरणाच्या नियमानुसार प्रशासकीय, तांत्रिक व आर्थिक दृष्ट्या मंजूर करण्याच्या स्तरावर आहे. यासाठी मा. सभापतींकडून प्राधिकरणाकडे पाठपुरावा करणेत येत आहे व त्या प्राधिकरणाकडून मंजूर होतील.

या अनुषंगाने श्री. कैलासचंद सेठी यांनी विचारले की, प्रस्तावीत योजनेचे

या अनुषंगाने मंडळाच्या सदस्यांनी प्रतिपादन केले की, झोपडपट्टी सुधार योजनेचे देयक अदा करण्यापुर्वी मंडळाच्या सदस्यांनी कामाची पाहणी केल्याशिवाय देयके अदा करण्यांत येऊ नये असे मंडळाच्या बैठकीत ठरले होते. परंतु त्याप्रमाणे मंडळाच्या सदस्यांना झोपडपट्टी सुधार योजनेचे कामे दाखविण्यांत आली नाही तरीही झोपडपट्टी सुधार योजनेची देयके अदा करण्यांत आली आहेत.

या अनुषंगाने खुलासा करण्यांत आला की, देयके अदा करावयाच्या कालावधीत आचारसंहिता असल्यामुळे असे करणे शक्य झालेले नाही. यापुढे झोपडपट्टी सुधार योजनेचा देयके, मंडळाच्या सदस्यांना कामाची पाहणी केल्यानंतरच अदा करण्यांत येतील.

परभणी येथील झोपडपट्टी सुधार योजने अंतर्गत मिळालेल्या अतिरिक्त १ कोटीच्या निधीबाबत मु.अ. यांनी प्रतिपादन केले की, गृ.नि. व वि.सं. ने झोपडपट्टी सुधार योजनेसाठी परभणी शहराला अतिरिक्त १ कोटीचा निधी मंजूर केल्याबाबतचे पत्र या कार्यालयास दि. ११.३.९६ रोजी प्राप्त झाले. सदर निधी शासनामार्फत प्राधिकरणाकडे येण्यास वेळ लागला.

परंतु अतिरिक्त निधीचा तरतुद करतांना न.प. परभणीची एवढा निधी खर्च करण्याची कुवत आहे किंवा नाही हे पाहाणे आवश्यक होते कारण १९९५.९६ आर्थिक वर्ष संपण्यास फारच थोडा कालावधी शिल्लक होता या कालावधीमध्ये अंदाजपत्रकाची तपासणी करणे व मंडळाच्या बैठकीत झोपडपट्टी सुधार योजनेच्या कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेसाठी प्रस्ताव ठेवण्यासाठी मंडळाच्या स्तरावर सर्वतोपरीने प्रयत्न करण्यांत येत होते. व अंदाजपत्रके मंजूर होऊन न.प. परभणीस काम सुरु करण्यासाठी कमीत कमी २५% अग्रीम देण्याचा [illegible] प्रस्ताव होता व त्यादृष्टीने २१.३.९६ रोजी मंडळाची विशेष बैठक आयोजित केली होती. परंतु २०.३.९६ ला लोकसभेच्या निवडणूका जाहीर झाल्या व आचारसंहितेमुळे मंडळाची बैठक घेता आली नाही व म्हणून पुढील कार्यवाही करणे शक्य झाले नाही.

यावर श्रीमती ताने सदस्या औ.मं. यांनी विचारले की, झोपडपट्टी सुधार योजनेच्या मान्यतेसाठी प्राधिकरणाकडे जावे लागेल का ?

यावर खुलासा करण्यांत आला की, झो.सु. योजनेच्या प्रशासकीय मान्यतेचे अधिकार मंडळास आहे.

मंडळाचे सदस्य श्री. आसारामजी तळेकर यांनी विचारले की, मंडळाच्या ९६.९७ मध्ये ज्या गृहनिर्माण योजना प्रस्तावीत केल्या आहेत त्या योजनेसाठी जमिन उपलब्ध आहे, नियोजन व आराखडे तयार करण्यासाठी कांहीही अडचण नाही व सर्व बाबी पुर्ण करुन प्रशासकीय मान्यता मिळेल हे गृहीत धरुन अर्थसंकल्पात आर्थिक व भौतिक उद्दिष्टांकरिता समावेश करण्यांत आलेला आहे अशा योजनांची सद्यस्थिती काय आहे ?

या अनुषंगाने मु.अ. यांनी प्रतिपादन केले की, मंडळाच्या ५ योजना अशा आहेत की, प्राधिकरणाच्या नियमानुसार प्रशासकीय, तांत्रिक व आर्थिक दृष्टया मंजूर करण्याच्या स्तरावर आहे. यासाठी मा. सभापतींकडून प्राधिकरणाकडे पाठपुरावा करणेत येत आहे व त्या प्राधिकरणाकडून मंजूर होतील.

या अनुषंगाने श्री. कैलासचंद सेठी यांनी विचारले की, प्रस्तावीत योजनेचे

टेंडर मागविले आहे का ?

यावर मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की फक्त लोकांकडून अनामत रक्कमेसह अर्ज प्राप्त करून घेतले आहे. प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर सदर योजनेच्या निविदा काढण्यात येतील.

श्री. आत्मारामजी तळेकर सदस्य औरंगाबाद मंडळ यांनी विचारले की, तिसगांव येथील योजना कार्यान्वित करण्यासाठी ज्या अडचणी आहेत म्हणजे क्षार्स हटविणे, पाणीपुरवठा, इत्यादी बाबत अडचणी आहेत त्या निवारण झाल्यात की, नाही,

यावर खुलासा करण्यात आला की, मंडळाच्या जागेवर जे क्षार्स होते ते बंद होते व ते हटविण्यात आले आहे. तसेच मंडळाच्या योजनेलगत जे क्षार्स होते ते हटविण्यासाठी मा. पालकमंत्री यांनी संबंधीत जिल्हाधिकारी यांना आदेश दिले आहेत. तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे याबाबत तक्रार केली आहे व त्यामुळे मंडळास योजना कार्यान्वित करता येत नाही असे निदर्शनास आणून दिलेले आहे. सदर क्षार्सवाल्यांना दुसरीकडे जागा उपलब्ध करून दिलेली आहे. तसेच सिडकोने डिसेंबर ९७ मध्ये तिसगांव येथील योजनेस पाणीपुरवठा करण्यांत येईल असे आश्वासन दिलेले आहे. मंडळाने सध्या २४ गाळे बांधलेले आहेत. त्यासाठी मंडळाने एका खाजगी विहीरीवरून पाण्याची तात्पुरती सोय केलेली आहे. तेंव्हा २४ गाळ्यांपैकी काही गाळे वाटप झालेले आहे व उर्वरीत गाळे वाटपासाठी प्रक्रिया चालु आहे. सिडकोने ९७ डिसेंबर अखेरपर्यन्त पाणीपुरवठा करण्याचे ये आश्वासन दिलेले आहे. त्यादृष्टीने तिसगांव येथील योजना कार्यान्वित करण्यास मंडळाने ठरविल्यास व तत्पुर्वी योजना सुरु करण्यासाठी जी प्रक्रिया सुरु करावयाची आहे त्यासाठी किमान १ ते दिड वर्ष लागण्याची शक्यता आहे. गाळ्यांच्या बांधकामासाठी प्रत्यक्ष सुरुवात करण्यापुर्वी ज्या प्राथमिक बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे त्याची कार्यवाही मंडळाने सुरु करावी असे मा. सभापतींनी व मंडळाच्या सदस्यांनी प्रतिपादन केले.

मुख्य अधिकारी यांनी प्रतिपादन केले की, या योजनेतील गाळ्यांच्या किंमतीमध्ये वाढ झालेली आहे व त्या वाढीनुसार सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करावी म्हणून मंडळाने प्राधिकरणाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे.

श्री. तळेकर यांनी मुकुंदवाडी येथील योजनेबाबत विचारणा केली. त्या अनुषंगाने खुलासा करण्यात आला की, मुकुंदवाडी येथील योजनेचे आराखडे सिडको मंजूर करत नाही. कारण मंडळाने ज्या वेळी ही जमिन ज्या किंमतीत घेतली त्यापेक्षा जास्त पैसे सिडको सध्या मागत आहे. त्यामुळे मंडळाच्या आराखड्यास व बांधकामास परवानगी सिडको देत नाही. यासाठी प्राधिकरणाकडे पत्रव्यवहार केला होता. प्राधिकरणाचे उपाध्यक्ष व सिडकोचे एम. डी. यांच्यामध्ये या प्रकरणी बैठक होऊन चर्चा झालेली आहे. परंतु अद्यापपर्यन्त अंतिम निर्णय झालेला नाही.

या अनुषंगाने मा. सभापतींना सांगितले की, सिडकोला सध्या श्री. भोगे आहेत त्यांच्याकडे आपण जाऊ व श्री. तळेकर यांना सुद्धा बरोबर यावे म्हणजे सिडकोच्या मुख्य प्रशासकांकडे जाऊन याबाबत चर्चा करून मार्ग काढण्याचा प्रयत्न करू.

श्री. गणेश भाठोरे सदस्य औ. मं. यांनी विचारणा केली की, मंडळाच्या मागील बैठकीत अतिक्रमण पथक तयार करण्याचे ठरले होते. त्या संदर्भात काय झाले ?

याबाबत मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, याबाबत प्राधिकरणाकडे पत्रव्यवहार केला होता. प्राधिकरणाने सध्या मंडळात जो कर्मचारी वर्ग आहेत त्यामधूनच अतिक्रमण पथकासाठी कर्मचाऱ्यांची नेमणूक करता येणार नाही का अशी विचारणा केली आहे.

या अनुषंगाने मा. श्री. किसनचंदजी तनवाणी सभापती यांनी सांगितले की, एक अतिक्रमण पथक तयार करावे त्यामध्ये एक उपअभियंता, दोन कनिष्ठ/शाखा अभियंता, एक आरक्षी, दोन आरक्षी, लिपी सहाय्यक व या पथकाचे प्रमुख म्हणून कार्यकारी अभियंता यांची नेमणूक करण्यात यावी.

मंडळाच्या संबंधीत भाडेवसुलीकारांनी मंडळाच्या वसाहतीत होणाऱ्या अतिक्रमणावर देखरेख ठेवावी व भविष्यात वसाहतीत अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्यावी व अतिक्रमण झाल्यास संबंधीत पथकास त्वरीत माहिती सादर करावी व पथकाने त्यावर कारवाई करावी.

श्री. पुंडलीकराव शिंदे सदस्य औरंगाबाद मंडळ यांना, साईनगर येथील १०३३ मध्यम उत्पन्न गट भूखंडधारकांना बांधकाम केले आहे व ओपनस्पेसवर त्यांनी वॉचमनसाठी घर बांधले आहे व तेथे वॉचमन राहत आहे व ११०५ ची सुध्दा तीच अवस्था आहे असे श्री. शिंदे यांनी सांगितले.

या अनुषंगाने मा. सभापतींनी विचारणा केली की, यासंबंधीची मिळकत व्यवस्थापकाकडे काही माहिती आहे का ? त्यांना शोकॉज नोटीस काढली आहे का ?

मिळकत व्यवस्थापक औरंगाबाद मंडळ यांना सांगितले की, ६५ लोकांना शोकॉज नोटीसा तयार करून सक्षम प्राधिकारी मुंबई यांच्याकडे पाठविल्या आहेत.

यावर मा. सभापतींनी सांगितले की, सक्षम प्राधिकारी यांच्याकडे अनाधिकृत बांधकामाबाबत/अनाधिकृत वास्तव्याबाबत, थकबाकीदारावर नोटीस बजावण्यासाठी किती प्रकरणे सक्षम प्राधिकाऱ्याकडे पाठविले आहे. सक्षम प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानुसार किती लोकांना गाळ्यातून काढून टाकण्याची कार्यवाही केली आहे. याबाबतची सविस्तर माहिती पुढील बैठकीत सादर करावी.

या अनुषंगाने चर्चा करतांना मा. सभापतींना कार्यकारी अभियंता यांना विचारले की, एन ५, एन ६ येथील वसाहतीमधील अतिक्रमणे दर्शविणारे नकाशे आपण तयार करून मिळकत व्यवस्थापकाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविली आहेत काय ?

यावर कार्यकारी अभियंता यांनी सांगितले की, त्वरीत कार्यवाही करून विभागाने जाने. ९९ मध्ये अतिक्रमण दर्शविणारे नकाशे मिळकत व्यवस्थापन विभागाकडे पाठविली आहेत.

यावर सभापतींनी मिळकत व्यवस्थापक यांना विचारले की, यावर काही कार्यवाही केली का ?

त्यावर सिडको व्यवस्थापक यांनी सांगितले की, मार्च अखेरच्या कामामुळे कार्यवाही होऊ शकली नाही.

यावर मा. सभापतींनी तीव्र नापसंती व्यक्त केली व मार्चनंतर तीन महिने ... उलटूनही कार्यवाही न झाल्याबद्दल खेद व्यक्त केला

श्री. आत्माराम तळेकर सदस्य औरंगाबाद मंडळ यांना सांगितले की, अतिक्रमणाबाबतच्या विषयावर सहा महिन्यापूर्वी निर्णय झालेला आहे व अद्याप पर्यन्त अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीस नोटीस काढल्या नाही यावर गांभीर्याने विचार झाला पाहिजे.

यावर चर्चा करतांना मा. श्री. किशनचंदजी तनवाणी यांनी सूचना केली की, गाळ्यालगत त्या गाळेधारकांना मंडळाच्या जागेवर अतिक्रमण केले आहे. त्यांना तात्काळ नोटीसा काढून केलेले अतिक्रमण काढून टाकण्यासाठी नोटीसा द्याव्यात म्हणजे त्यानंतरच अतिक्रमण केलेले लोक, ... ... पैसे भरण्यासाठी मंडळाकडे येतील व मंडळास निधी मिळू शकेल.

श्री. आत्मारामजी तळेकर सदस्य औरंगाबाद मंडळ यांनी प्रतिपादन केले की, सिडको एन-५ येथे धर्मवीर संभाजी विद्यालय व म्हाडाच्या कॉलनीमधील जागेवर लोकांनी अतिक्रमण करून बांधकाम केलेले आहे. त्याविषयी मंडळातर्फे काय कार्यवाही करण्यात आली आहे.

यावर खुलासा करण्यात आला की, ती जागा मंडळाची नाही व सिडकोने मंडळाच्या ताब्यात दिलेली नाही. त्यामुळे म्हाडाच्या त्या जमिनीशी काही संबंध नाही.

जी जागा कायद्याप्रमाणे देता येत नाही ती अतिक्रमणे काढून टाकावी. अतिक्रमण झाले आहे त्यामुळे संबंधी मनपा/न.प. खुल्या जागा ताब्यात घेत नाही.

श्री. तळेकर यांनी सांगितले की, एन-६ सिडको येथील ड्रेनेजचे पाणी लोकांच्या घरात घुसते. यावर मा. श्री. किशनचंद तनवाणी यांनी खुलासा केला की, ड्रेनेज लाईनचे पाणी लोकांच्या घरात जात नसून फक्त पावसाचे पाणी लोकांच्या घरात जाते त्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

चर्चेच्या ओघात मंडळाचे सदस्य श्री. कैलासचंद सेठी यांनी विचारले की, हास्तुर येथे म्हाडाच्या नियंत्रणाखाली एक युनिट कार्यरत आहेत त्याचा आणि मंडळाचा तसा काही संबंध नाही असा उल्लेख मागील बैठकीच्या कार्यवृत्तांत आहे तेव्हा याबाबत खुलासा करावा.

यावर मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी खुलासा केला की, हास्तुर येथे काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचे वेतनच आपण येथून देतो, कारण तेथे अशी व्यवस्था नसल्यामुळे मंडळातर्फे वेतन अदा केले जाते. हास्तुर येथील प्रकल्पाचे काम पाहण्यासाठी स्वतंत्र अधिकारी आहे व तेथील युनिट हे म्हाडाच्या नियंत्रणाखाली आहे.

मंडळाचे सदस्य श्री. तळेकर यांनी मुद्दा उपस्थित केला की, जालना येथील जाहिरातीत फक्त १०% रकमेचा उल्लेख आहे. परंतु मागील बैठकीत तर २५% रकम घेण्याचे ठरले होते अशा प्रकारचा तफावत का ?

या अनुषंगाने खुलासा करण्यात आला की, २५% रकम घेण्याचा प्रश्न हा मुकुंदवाडी येथील योजनेसाठी होता व म्हाडाने २५% रकम घेण्याचे सांगितले होते.

[illegible]

श्रीमती सानेसदस्य औरंगाबाद मंडळ यांनी विचारले की, परभणी येथील योजनेसाठी रू. ३,०००/- व रू. ५,०००/- सह अर्ज घेतलेले आहे. सदर योजनेसाठी अर्जही प्राप्त असतांना योजना अद्याप कार्यान्वित होत नाही.

या अनुषंगाने मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी प्रतिपादन केले की, प्रत्येक अर्जदाराकडून रू. ३००० घेतलेले आहे. परंतु परभणी येथील मागील अनुभवावरून घरे जाणार नाहीत. त्यामुळे प्राधिकरणाने घरा ऐवजी भूखंडाची योजना कार्यान्वित करावी असे कळविले होते. परंतु लोकांना प्लॉट घेणार का असे विचारले असता त्यांनी घरेच बांधून द्यावी अशी मागणी केला आहे. त्याप्रमाणे प्राधिकरणाकडे कळविण्यात आले आहे. लवकरच योजना मंजूर होईल.

या विषयावर चर्चा करतांना मंडळाचे सदस्य श्री. सेठी यांनी सूचना केली की, ६ महिने किंवा एक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी अनामत रकम मंडळाकडे पडून राहणार आहे त्यावर व्याज देण्यात यावे.

यावर खुलासा करण्यात आला की, अनामत रकमेवर व्याज देण्याची तरतूद नाही त्यामुळे तसे करता येणार नाही.

मंडळाच्या कार्यवृत्तांवर सविस्तर चर्चा होऊन चर्चेप्रमाणे कार्यवाही करण्याचा निर्णय होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ६१२

मंडळाच्या दिनांक २९. १. १९८६ रोजी झालेल्या १०० व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतवर चर्चा होऊन मंडळाच्या १०० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्यात आला.

विषय क्र. २: औरंगाबाद मंडळाच्या कार्यालयीन इमारतीच्या रक्षणासाठी नेमण्यात आलेल्या सेक्युरिटी सर्व्हिसच्या कराराबाबत.

सदर विषयाची बाब टिप्पणी मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी मंडळास वाचून दाखविली. यावर चर्चा करतांना मंडळाचे सदस्य श्री. सुनील ठाकूर यांनी प्रतिपादन केले की, यापूर्वी जाहिरात देऊन निविदा मागविल्या होत्या का ?

यावर खुलासा करण्यात आला की, जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या.

यानंतर सुजीत ठाकुर यांनी सूचना केली की, मंडळाच्या सेक्युरिटीसाठी नविन निविदा मागविण्यात याव्यात.

चर्चेत भाग घेताना मा. श्री. किसनचंदजी तनवाणी सभापती औरंगाबाद मंडळ यांनी प्रतिपादन केले की, औरंगाबाद मंडळाकडे एकत्रीत वेतनावर वर्षानुवर्षे काम करणाऱ्या लोकांना प्राधान्य देऊन सेक्युरिटी सर्व्हीसेस ऐवजी या लोकांना ज्येष्ठतेनुसार वॉचमन म्हणून नेमणूक करण्यात यावे.

या अनुषंगाने मंडळाचे सदस्य श्री. कैलासचंद सेठी यांनी सांगितले की, मंडळाच्या सुरक्षेची जबाबदारी रोजंदारीवरील लोकांवर सोपविणे योग्य ठरणार नाही.

चर्चेच्या ओघात मा. श्री. तनवाणी सभापती औरंगाबाद मंडळ यांनी सांगितले की, जे लोक ५ ते ७ वर्षापासून मंडळाच्या सेवेत एकत्रीत रु. ५०१/- वेतनावर काम करतात त्यांना आपण अल्प मोबदला देतो हे संयुक्तीक नाही. एक अनुभवासाठी एकत्रीत वेतनावरील लोकांमधून रोजंदारीवर अथवा २९ दिवसाच्या अटीवर त्यांना नेमून त्यांच्याकडून मंडळाच्या सुरक्षेची कामे करून घ्यावी.

या अनुषंगाने मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी प्रतिपादन केले की, सेक्युरिटी सर्व्हीसेसची करारनाम्याप्रमाणे सर्व जबाबदारी सदर संस्थेवर असते तसेच पुर्ण वेळ कर्मचाऱ्यांची वॉचमन म्हणून नेमणूक केल्यास त्यास [illegible] नियमानुसार वेतन द्यावे लागते व त्याच बरोबर रजा, वैद्यकीय रजा, ग्रॅच्युईटी, भ. नि. नि. ची वर्गणी, मंडळाचे अंशदान इत्यादी सुविधा द्याव्या लागतात व त्यामुळे मंडळावर जास्त आर्थिक बोजा पडतो. जर नविन कर्मचाऱ्यांची नेमणूक करावयाची असेल तर त्याचे अधिकार मंडळास नाही. प्राधिकरणाकडे प्रस्ताव पाठवावा लागेल. मंडळाने ज्या लोकांची शिफारस केली आहे. त्यांचीच नेमणूक करण्याची परवानगी मिळेल असे शक्यता नाही. त्यासाठी सरळ सेवा भरतीच्या नियमाचे पालन करावे लागेल. त्यामुळे एखाद्या संस्थेकडून सेक्युरिटी सर्व्हीसेसची कामे करून घेणे योग्य आहे.

यावर मा. श्री. किसनचंदजी तनवाणी सभापती औरंगाबाद मंडळ यांनी सांगितले की, एकत्रीत वेतनावर काम करणाऱ्या लोकांमधून वॉचमन म्हणून नेमण्यासाठी प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठवावा व नविन निविदा मागवून एक वर्षासाठी सेक्युरिटी सर्व्हीसेसची नेमणूक करावी. नविन एजन्सीची नेमणूक होईपर्यन्त मे. मेडोस्टर्स व अजिंठा सेक्युरिटी प्रा. लि. या एजन्सीकडून पुर्वीच्याच करारामधील नियम व अटी आणि त्याच दरावर मंडळाच्या सेक्युरिटीचे काम करून घ्यावी.

[illegible]

यावर चर्चा करतांना मंडळाचे सदस्य ॲड. कैलासचंद सेठी यांनी सांगितले की, ५ वर्षापासून रु. ५००/- वर काम करतात माणुसकीच्या दृष्टीकोणा ठेवुन किमान वेतन कायद्याप्रमाणे एकत्रीत वेतनावरील लोकांना वेतन देण्याची शिफारस प्राधिकरणाकडे करावी.

प्रा. अशोक लोखंडे सदस्य औ. मं. यांनी सुचना केली की, एकत्रीत वेतनावरील लोकांना वेतन वाढवुन द्यावे.

याच अनुषंगाने मंडळाच्या सदस्यांनी प्रतिपादन केले की, सहानुभूतीच्या दृष्टीकोणा ठेवुन वेतनात वाढ करावी.

या विषयावर सावस्तर चर्चा होऊन मंडळाने एकमताने निर्णय घेतला की,

<u>ठराव क्र. ६१३</u>

१] मंडळाच्या सेक्युरिटीसाठी नेमलेल्या मे. मेडिपसर्स अजिंठा सेक्युरिटी प्रा. लि. या संस्थेचा करार ७.६.९६ रोजी संपलेला असुन नविन निविदा मागवुन सेक्युरिटीची कामे सोपविण्यांत यावे परंतु एक वर्षासाठी नविन निविदा मागवुन सेक्युरिटी सर्व्हीसची नेमणूक होईपर्यन्त मे. मेडिपर्स अजिंठा सेक्युरिटी प्रा. लि. या एजन्सीकडून पुर्वीच्या करातील अटी व नियम आणि त्याच दरावर काम करुन घ्यावे.

२] मंडळाकडे एकत्रितवेतनावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यासपूर्व वेळोवेळेनुसार नांवासह प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठवुन त्या कर्मचाऱ्यांची मंडळाच्या सुरक्षेच्या देखभालीसाठी वॉचमन म्हणून नेमण्याची परवानगी मागावी व एकत्रीत वेतनावरील काम करणाऱ्या लोकांना किमान वेतन कायद्याप्रमाणे वेतन मंजूर करण्यासाठी प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठवावा.

विषय क्र. ३: औरंगाबाद मंडळाकरिता न्यायालयीन प्रकरणाकरिता वकीलाचे पॅनेल नेमणेबाबत.

या विषयाची बाब टिप्पणी मुख्य अधिकारी यांनी मंडळात वाचुन दाखविली. यानंतर सदस्यांनी पॅनलवरील वकीलांच्या योग्ययोग्यतेबाबत विचारणा केली.

त्यावर मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी प्रतिपादन केले की, वकीलांची योग्ययोग्यता ही या क्षणाला आपल्याला ठरविता येत नाही कारण जी प्रकरणे वकीलांकडे सोपविली त्या मध्ये अंतिम निर्णय झालेला नाही. मंडळाच्या पॅनलवरील सर्वच वकीलांनी समाधानकारक काम केले आहे व मंडळानी ज्या ज्या वेळी त्यांचेकडे प्रकरण पाठवले त्या त्या वेळी कार्यवाहीत तत्परता दाखविलेली आहे.

मंडळाचे सदस्य ॲड. कैलासचंद सेठी यांनी या विषयावर चर्चा करतांना प्रतिपादन केले की, सन ९३ मध्ये जाहिरात देऊन सन १९९५ मध्ये वकीलाचे पॅनेल नेमले आहे. मी सुद्धा वकील असल्यामुळे तसेच औरंगाबादचा असल्याने माझे असे मत आहे की, सन १९९३ ची तुलना १९९६ मध्ये केल्यास अजुनही

चांगले अनुभवी वकील, मंडळास जाहिरात देऊन पॅनलवर घेता येतील.

करिता नविन वकीलांचे पॅनल दोन वर्षांकरिता नेमण्यासाठी जाहिरात द्यावी.

या विषयाच्या अनुषंगाने मा. सभापती औरंगाबाद मंडळ यांनी प्रतिपादन केले की, नविन वकीलांचे पॅनल नेमण्यासाठी जाहिरात द्यावी व नविन वकीलांचे पॅनल येईपर्यन्त जुन्या वकीलांच्या पॅनलकडून न्यायालयीन प्रकरणे चालविण्यात यावी.

श्री. गणेश भाटोरे सदस्य औरंगाबाद मंडळ यांनी विचारले की, उच्च न्यायालयाचे काम पाहणाऱ्या वकीलांना लॉ ऑफिसर्स रूल्स प्रमाणे फिस देण्यात येते तर जिल्हा न्यायालय व अन्य प्रकरणे चालविणाऱ्या वकीलांना प्रति प्रकरण रू. १०००/- इतकी फिस देण्यात येते ती एकदम देण्यात येते किंवा कसे.

या अनुषंगाने खुलासा करण्यात आला की, मंडळाकडून देण्यात येणारी फिस ही प्रकरणांच्या टप्प्याटप्प्यानुसार वकीलांना देण्यात येते.

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने एकमताने निर्णय घेतला की,

ठराव क्र. ६१४

औरंगाबाद मंडळाच्या पॅनलवर दोन वर्षाच्या कालावधीसाठी वकील नेमण्यासाठी जाहिरात देण्यात यावी व नविन वकीलांचे पॅनल अस्तित्वात येईपर्यन्त जुन्या वकीलांनीच काम पहावे.

आयत्यावेळचा विषय.

१] मा. श्री. किशनचंद तनवाणी सभापती औरंगाबाद मंडळ यांनी विचारणा केली की, लेबर कॉलनी नांदेड येथील भूखंडाची मंडळाने भूखंड क्र. २, ३, ४ ची जाहिरात दिली आहे व भूखंड क्र. १ ची का जाहिरात दिली नाही त्यावर अतिक्रमण आहे का ? ती जमिन मंडळाकडे केंव्हा आली.

यावर मिळकत व्यवस्थापक औरंगाबाद मंडळ यांनी सांगितले की, चौकशी करून पुढील बैठकीपुढे माहिती सादर करतो.

२] संभाजीनगरमध्ये गृहनिर्माण मंडळाच्या कार्यक्षेत्रात दुसऱ्या जमिनी संपादीत करून विकास करण्याचा विचार आहे का ? असे ॲड. कैलासचंद सेठी सदस्य औरंगाबाद मंडळ यांनी विचारले.

यावर खुलासा करतांना मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी प्रतिपादन केले की, म्हाडा ॲक्ट नुसार दोन प्रकारे जमिन संपादीत करता येते.

१] म्हाडा ॲक्ट कलम ४१ प्रमाणे जमिन संपादन करता येते.

२] म्हाडा ॲक्ट कलम ५१ नुसार जमिन मालकाशी प्रत्यक्षात वाटाघाटी करून जमिन खरेदी करता येते. त्याची एक समिती आहे. त्या समितीचे सदस्य

सभापती, मुख्य अधिकारी व त्या त्या जिल्ह्याचे सहाय्यक संचालक नगररचना हे आहेत. जमिन मालकांशी वाटाघाटी द्वारे जमिन घेता येते.

म्हाडा ॲक्ट कलम ४१ खाली संपादित करण्यात येणाऱ्या जमिनी या लॅन्ड बँक म्हणून संपादित करण्याचा प्रघात आहे. परंतु ११.१.९४ च्या सुप्रीम कोर्टाच्या निर्णयामुळे प्रारंभिक सुचना निघालेल्या आहेत त्या शासनाने रद्द केलेल्या आहेत व ज्या जमिनीचे संपादनासाठीचे प्रस्ताव पाठविले आहे ते प्राधिकरणाकडे पडून आहे त्यातही न्यायालयाच्या निर्णयानुसार प्रारंभिक सुचना निघू शकणार नाही. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे यापुढे जमिन संपादन करण्यापुर्वी संपूर्ण योजना तयार करुन शासनातर्फे मंजूर करुन घ्यावी लागेल. तथापी सद्य:स्थितीत याबाबत स्पष्ट मार्गदर्शक सूचना नसल्यामुळे जमिन संपादन करण्याची कार्यवाही केलेली नाही.

यावर चर्चा करतांना मंडळाचे सभापती महोदयांनी व सन्माननीय सदस्यांनी प्रतिपादन केले की, सुप्रीम कोर्टाच्या निर्णयामुळे अगोदर घरासाठी लोकांची किती मागणी आहे ती आजमावण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन फक्त अर्ज मागविण्यात यावे. मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांच्या ठिकाणी गृहनिर्माणाच्या योजना राबविण्यास्तव अशा जाहिरातीद्वारे मागणी अंदाज अजमाविण्यात यावा.

या विषयावर चर्चा करतांना मा.श्री. किशनचंद तनवाणी सभापती औरंगाबाद मंडळ यांनी सांगितले की, प्रस्तावित गृहनिर्माण योजनेच्या दृष्टीने मागणी नोंदवितांना फक्त मंडळाच्या जाहिरातीतच विहीत केलेल्या नमुन्यात अर्ज भरुन घ्यावा व कुठलीही अनामत रक्कम घेण्यात येऊ नये.

प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी गृहनिर्माण योजनेसाठी आवश्यक ती जमिन पाहण्यासाठी/निवड करण्यासाठी एक समिती नेमावी असे सर्वानुमते ठरले या समितीत मंडळाचे सभापती व संबंधीत जिल्ह्याचा मंडळाचा सदस्य व औरंगाबाद येथील मंडळाचे सदस्य श्री. अनील पोलकर, श्री. आत्माराम तळेकर व कार्यकारी अभियंता औरंगाबाद मंडळ हे या समितीचे सदस्य असतील असे ठरविण्यात आले समितीने जमिन पाहून प्रस्ताव करावा व मंडळाच्या विचारार्थ सादर करावा.

मंडळाचे प्राधिकरणाकडे प्रलंबित प्रकरणाचा पाठपुरावा करण्यासाठी खालील पदाधिकाऱ्यांची समिती गठीत करण्याचा मंडळाने निर्णय घेतला.

१] मा.श्री. तनवाणी सभापती, [२] ॲड. कैलासचंद सेठी, ३] श्री. सुरेशा जैन, ४] श्री. नारायण जाधव, [५] श्री. गणेश माहोरे.

या विषयावर चर्चा करतांना मा.श्री. तनवाणी यांना सांगितले की, सुप्रीम कोर्टाच्या निर्णयामुळे कलम ४१ खालील जमिन संपादनाच्या प्रारंभिक सुचना शासनाने रद्द केलेल्या आहेत. तसेच मंडळातर्फे खालील ठिकाणच्या जमिन संपादनाचे प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविले आहेत.--

| ठिकाण | क्षेत्रफळ हेक्टर | प्राधिकरणास प्रस्ताव पाठविल्याचा पत्र क्र. दिनांक |
|---|---|---|
| नक्षत्रवाडी औरंगाबाद | ८६.०० | पत्र क्र.८४०० दि. २२.११.९३ |
| जालना | ३२.२७ | पत्र क्र. ०५८७३ दिनांक १७.९.९२ |
| परभणी | २१.२७ | पत्र क्र. ६१२८ दिनांक १.१०.९२ |
| बीड | २७.३४ | पत्र क्र. ६१५२ दिनांक ६.१०.९२ |
| पुर्णा जि. परभणी | ५.०० | पत्र क्र. १३५६ दिनांक २.३.९३ |

परंतु अद्याप प्रारंभिक सुचनापत्र निघाले नाही व न्यायालयाने निकाला मुळे आता प्रारंभिक सुचना निघेल असे वाटत नाही. त्यामुळे संबंधीत भागाचा विकास कुंठीत झाला आहे. न्यायालयाच्या निर्णयामुळे यापुढील कार्यवाही करण्यास बराच कालावधी लागणार आहे तो पर्यन्त या भागाचा विकास थांबू नये म्हणून सदरचे प्रस्ताव रद्द करावे अशी शिफारस मंडळ करित आहे व तसा प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठवावा असे ठरले.

श्री. आत्मारामजी तळेकर सदस्य औ.मं. यांनी विचारणा केली की, मा. गृहनिर्माण मंत्री तथा पालकमंत्री यांनी वाळूज महानगरचे काम म्हाडाकडे सोपविण्यांत येईल असे प्रतिपादन केले होते. त्यादृष्टीने म्हाडाने वाळुज भागातील काही जमिन सिडकोकडून घेऊन त्यावर गृहनिर्माणाचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात राबवावा.

मा. श्री. तनवाणी सभापती औरंगाबादमंडळ यांनी सांगितले की, त्यासाठी सिडकोस पत्रव्यवहार करण्यांत येईल.

मा. सभापती श्री. तनवाणी यांनी सांगितले की, सन १९८६ मध्ये औरंगाबाद येथे १००, २००, ५०० रुपयाच्या अनामत रक्कमेसह मागणी अंदाज नोंदविण्यासाठी अर्ज मागविले होते. त्यासाठी चांगला प्रतिसाद मिळाला होता. परंतु त्यांना अद्यापपर्यन्त कोणत्याही योजनेत प्राधान्य देण्यांत आले नाही. मा. सभापती औरंगाबाद मंडळ यांनी पुढे सांगितले की, तीसगांव येथील योजना लवकरच कार्यान्वित होण्याची शक्यता आहे तेथे या अर्जदारांना प्राधान्य देण्यास हरकत नसावी. यावर सांगोपांग चर्चा होऊन मंडळाने ठरविले की, ज्यावेळी तीसगांव व इतर प्रस्तावित गृहनिर्माण योजना कार्यान्वित होईल तेंव्हा सन १९८६ साली ज्या लोकांनी अर्ज केले आहेत त्यांचा प्राधान्याने विचार करण्यांत यावा.

श्री. नारायण जाधव सदस्य औ.मं. यांनी मुद्दा उपस्थित केला की, मंडळाच्या सदस्यासाठी बसण्याची व्यवस्थेसाठी स्वतंत्र कक्ष देण्याची, ओळखपत्र, लेटरपॅड छापून देण्याची मागणी यापुर्वी करण्यात आली होती. परंतु अजून पर्यन्त त्याची पुर्तता करण्यांत आली नाही.

यावर मुख्य अधिकारी यांनी ओळखपत्र सदस्यांना देण्याची व्यवस्था करण्यांत येईल असे सांगितले.

श्रीमती उषा माने, सदस्या औरंगाबाद मंडळ यांनी सांगितले की, परभणी येथे एक झोपडपट्टी आहे त्या झोपडपट्टीचे २०० ते २५० सभासद आहेत त्यांच्याकडे जमिन आहे. परंतु ते स्वबळावर घरे बांधू शकत नाहीत. त्यांना मंडळातर्फे घरे बांधून देण्यात यावीत.

यावर मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, विशिष्ट गटासाठी मंडळ गृहनिर्माण योजना राबवीत नाही.

यावर श्रीमती माने यांनी सांगितले की, सदर झोपडपट्टीचे सभासद जमिन देण्यास तयार आहे. करिता त्यांच्यासाठी योजना राबवावी.

यावर मा. सभापती महोदयांनी सांगितले की, परभणी येथे पुढच्या महिन्यात येणार आहे तेंव्हा [illegible] विचाराअंती निर्णय करू.

श्री. सुधीर ठाकूर सदस्य औ. मं. यांनी सांगितले की, उस्मानाबाद व भूम येथील जमिन मालकांनी म्हाडास जमिन देण्याची संमती दिली आहे व त्यावर योजना घेण्याच्या दृष्टीने मंडळातर्फे कार्यवाही करण्यात यावी व मंडळाच्या सन १९९६-९७ च्या सुधारीत अंदाजपत्रकात त्याचा अंतर्भाव करण्यात यावा.

यावर मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी सांगितले की, लवकरच याविषयी योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

चर्चेत भाग घेतांना मंडळाचे सदस्य श्री. कुंडलीकराव शिंदे यांनी सूचना केली की, विकास नियंत्रण नियमाप्रमाणे योजनेच्या अभिन्यासामध्ये १५% जागा पूर्वी सोडावी लागत असे परंतु आता १०% जागा सोडावी असे सुधारीत नियम अस्तीत्वात आहे असे वाटते. त्याप्रमाणे मंडळाच्या वसाहतीतील विकास नियंत्रण नियमाप्रमाणे सोडलेल्या जागेबाबत विचार करून तेथे व्यापारी तत्वावर सुविधा भूखंड देता येतील किंवा कसे याची चौकशी करून कार्यवाही करावी.

श्री. सुधीर ठाकुर यांनी प्रतिपादन केले की, औरंगाबाद येथील म्हाडाच्या वसाहतीतील पाणीपुरवठा म्हाडाने पैसे भरले नाही म्हणून पाणीपुरवठा खंडीत केला असा बातमी वर्तमानपत्रातून वाचली आहे. त्यामुळे म्हाडाची प्रतिमा जनमानसात डागाळली जाते. याबाबत खुलासा व्हावा.

यावर खुलासा करण्यात आला की, हा रघुनाथनगर येथील वसाहतीचा प्रश्न असून मनपाला सुधारीत दराने पाणीपुरवठ्याची देयके दिलेली आहेत. मनपास वेळोवेळी याबाबत नियमाप्रमाणे पाण्याचे देयक देण्यात यावे यासाठी पाठपुरावा केला आहे. परंतु मनपाकडून याबाबत प्रतिसाद मिळत नाही.

या अनुषंगाने मा. श्री. तनपुरे यांनी विचारणा केली की, १९२ मध्यम उत्पन्न गट व ७२ उच्च उत्पन्न गट या योजनेतील पाणीपुरवठ्याचे देयक अदा केले आहे का ?

यावर खुलासा करण्यात आला की, मनपाकडून पाणीपुरवठ्याचे देयक आलेले नाही. त्यामुळे देयक अदा करता आलेले नाही.

<u>सरचार्ज</u>

गाळेधारक गाळ्यांचे मासिक हप्ते देण्याच्या वेळी भरत नाहीत त्यामुळे गाळेधारकांकडून १०%, २०% दराने सरचार्ज किंवा हुडकोच्या योजनेतील गाळ्यांना हुडकोच्या व्याजदराप्रमाणे व्याज आकारावयाचे आहे. परंतु माझ्या असे निदर्शनास आले आहे की, कांही गाळेधारकांकडून सरचार्ज घेण्यात येतो व कांही गाळेधारकांकडून सरचार्ज वसूल करण्यात आलेला नाही असे मा. सभापतीमहोदयांना सांगितले

यावर सविस्तर चर्चा करतांना मंडळाच्या सदस्यांनी प्रतिपादन केले की, गाळेधारकाचे गाळे ताब्यात घेण्यापूर्वी तीन महिण्याचे भाडे हे डिपॉझीट म्हणून घेण्यात येते. तर गाळेधारकांनी ३ महिण्यापर्यंत गाळ्याचे हप्ते भरले नाही तर त्यास सरचार्ज आकारण्यात येऊ नये. त्यानंतर ४ थ्या किंवा ५ व्या महिन्यात सरचार्ज आकारण्यात यावा यासाठी प्राधिकरणाकडे प्रस्ताव पाठवावा असे मंडळाच्या सदस्यांनी सांगितले.

श्री. आसारामजी तळेकर यांनी प्रतिपादन केले की, कांही थकबाकीदारांकडून सरचार्ज वसूल केला व कांहींकडून सरचार्ज घेतला नाही ही बाब बरोबर नाही या प्रकरणी जे दोषी असतील त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करावी.

यावर मुख्य अधिकारी यांनी प्रतिपादन केले की, या प्रकरणी चौकशीसाठी एक पथक नेमले आहे व ते काम करीत आहे. सदर पथकाचा अहवाल प्राप्त झाल्या नंतर, त्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

मंडळाच्या सदस्यांनी या अनुषंगाने सूचना केली की, चौकशी पथकाचा अहवालाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मंडळाच्या पुढील बैठकीत सादर करावा.

चर्चेच्या ओघात ॲड. कैलासचंद सेठी सदस्य औ.सं. यांनी सूचना केली की, सदस्यांना हवी असणारी माहिती तात्काळ मिळावी अशी अपेक्षा करणे इष्ट नाही. त्यासाठी मंडळाच्या सदस्यांनी, जी माहिती हवी आहे, त्यासाठी बैठकीच्या किमान ८ दिवस अगोदर काय माहिती हवी आहे ते कळवावे म्हणजे त्यानुसार अधिका-यांना माहिती तयार करून ठेवता येईल.

मा. सभापतींनी बैठकीचा समारोप करतांना उपस्थितांचे आभार मानले व सांगितले की, मंडळाची १०१ वी बैठक असून या मंडळाची चौथी बैठक आहे. मंडळाच्या सदस्यांनी, अधिका-यांनी/कर्मचा-यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी धन्यवाद दिले. सामुहिक राष्ट्रगीतानंतर बैठक संपल्याचे मा. सभापतींनी जाहीर केले.

.....